# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

श्री सिध्दिविनायक

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.

दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२

ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org

वेबसाईट : www.siddhivinayak.org


## किराणा माल खरेदीसाठी पुनर्निविदा मागविण्याबाबत.

---

### किराणा माल पुरवठा कालावधी
### ऑगस्ट २०२६ ते जुलै, २०२७ पर्यंत

फोन नंबर – ०२२ – ६२४९११११, ६२४९११६०

---

महाप्रसादाकरीता लागणारा किराणा माल खरेदी करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहीती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाउनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in करण्यासाठी किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | : – शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ |
| ई निविदापुर्व बैठक वार व दिनांक | : – मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६, वेळ – दु. २.०० वा |
| किराणा माल नमुना तपासणीकरीता सादर करावयाचा अंतिम दिनांक | : – गुरूवार दि. ३ सप्टेंबर २०२६, वेळ – सायं. ५.०० वा |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | : – सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६, वेळ –सायं. ५.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | : – बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६, वेळ – दु. २.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | : – बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६, वेळ – दु. २.३० वा. |
| स्थळ | : – श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला मंदिर न्यास कार्यालय. |

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

## मंदिरात लागणारा किराणा माल खरेदी करण्यासाठी पुनर्निविदा मागविण्याबाबत.

किराणा माल पुरवठा कालावधी ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ पर्यंत.



| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सुचना, वार, दिनांक, वेळ | १ |
| २ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्रे | ३ |
| ३ | निविदेची किंमत/शुल्क, बयाणा रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती | ४ |
| ४ | निविदाधारकाबाबतची माहिती | ५ |
| ५ | हमीपत्र | ६ |
| ६ | मागिल ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापालांचे प्रमाणपत्र | ७ |
| ७ | निविदा मागविण्याची माहीती | ८ |
| ८ | ई. निविदा अटी व शर्ती | ९ ते १० |
| ९ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) मुळ निविदेचा तपशील | १२ ते १४ |

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्रे

अ) तांत्रिक कागदपत्रे (Technical Bid)

१. निविदेची किंमत / शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत

२. बयाणा रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत

३. राष्ट्रीयीकृत / अनुसूचित बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) १५,००,०००/–

४. अद्ययावत कंपनी नोंदणी दाखला / दुकाने नोंदणी दाखला

५. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अद्ययावत प्रमाणपत्र (Fssai Registration Updated Certificate)

६. आयकर नोंदणी पॅन कार्ड ( Pan Card)

७. वस्तू व सेवाकर नोंदणी दाखला (GST Registration)

८. मागील ३ वर्षाचा (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ ) आयकर आणि वस्तू व सेवाकर विवरणपत्र (IT & GST Returns)

९. आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र

टिप – ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल ४५,००,०००/–पेक्षा जास्त असावी.

शासकीय / निमशासकीय रुग्णालय / आस्थापना / संस्था / कार्यालये / मंदिर / देवस्थान / उपाहारगृहे इ. ठिकाणी किराणा माल पुरवठा करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे (कार्यादेश/पुरवठा आदेश/देयकाच्या प्रती)

१०.हमीपत्र (रू. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून) काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नावाच्या प्राधिकार पत्राची प्रत

टीप – मुल्य निविदा तांत्रिक निविदेत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे भरण्यात यावी. अन्यथा निविदाकारास अपात्र ठरविण्यात येईल.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र “अ”

| अ. क्र. | तपशिल | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | किराणा माल | ५,०००/— | रू. १ लक्ष |

टिप : वर नमूद मालाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | तपशिल | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) | मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) |
| १ | किराणा माल | १५,००,०००/— | ४५,००,०००/— |

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

# निविदाधारकाबाबत माहिती

१) फर्मचे/कंपनीचे नांव :-----------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

३) संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक

अ) ऑफीस :-----------------------------------------

ब) दुकान :-----------------------------------------

क) मोबाईल क्रमांक :-----------------------------------------

ड) फॅक्स क्रमांक :-----------------------------------------

इ) ई–मेल :-----------------------------------------

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव :-----------------------------------------

मोबाईल क्रमांक :-----------------------------------------

५) मालकाचे / भागीदारांची नावे : अ) -----------------------------------------

ब) -----------------------------------------

६) सेवाकर क्रमांक **(GST No.)** :-----------------------------------------

७) आयकर नोंदणी पॅन क्रमांक :-----------------------------------------

(रू. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून)

## हमीपत्र

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

महोदया,

मी/आम्ही ————————————————————————————

खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार भोजनासाठी लागणारा किराणा माल आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर पुरवठा करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये वस्तू व सेवाकर (जी.एस.टी.) वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहीत केल्यानुसार Bank Guarantee देण्यास बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या मालाचा पुरवठा करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही तसेच कंपनीचा काळया यादीत समावेश नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

दिनांक :   /   /२०२६

निविदाधारकाची सही व शिक्का

## (सनदी लेखापालाचे लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ________________________________ यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी ( आर्थिक वर्ष ) | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२२–२३ | |
| २ | वर्ष २०२३–२४ | |
| ३ | वर्ष २०२४–२५ | |
| | | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :– / / २०२६

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड काऊटंन्ट
(नाव / सही शिक्का)

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

## निविदा मागविण्याबाबतची माहिती.

१) निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क व बयाणा रक्कम निविदा कागदपत्रांतील जोडपत्र "अ" प्रमाणे ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाणा रकमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही.

२) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय.MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाणा रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

४) निविदेसोबत राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.

५) निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

६) निविदाधारकास एक किंवा अनेक मालाच्या पुरवठयाकरीता निविदा सादर करता येतील. तथापि प्रत्येक मालासाठी विहित केलेली जोडपत्र 'अ' मधील बयाणा रक्कम ही त्यासाठी अदा करावी लागेल. **मुल्य निविदेतील दर हे कर वगळून असावेत.**

७) निविदेमध्ये नमूद किराणा मालाचा नमूना (ब्रॅन्ड नसलेला) १०० ग्रॅमच्या पिशवीत भरून दि. ३ सप्टेंबर, २०२६ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतीक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्षात जमा करणे आवश्यक राहील. निविदाकाराने तपासणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम भरून त्याची पोच घ्यावी.

तपासणीसाठी किराणा मालाचे नमूने दिनांक ३ सप्टेंबर, २०२६ नंतर सादर करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर नमून्यावर निविदाकाराने खालीलप्रमाणे माहिती भरून चिकटवणे आवश्यक राहील.

**निविदाकाराचे नाव –:**

**प्रत्येक नमून्याचे नाव –:**

**प्रत्येक नमून्याचे प्रमाण –: १०० ग्रॅम (पिशवीमध्ये)**

**सादर केल्याचा दिनांक –: वेळ–:**

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

## अटी व शर्ती

१) किराणा मालाच्या पुरवठयाचा कालावधी हा कार्यादेशाच्या दिनांक पासून एक वर्ष पर्यंत वैध राहील. तथापि, कार्यादेशाचा कालावधी संपल्यानंतर पुढील वर्षाकरीता किराणा मालाच्या पुरवठयासाठी निविदा प्रक्रियेद्वारा नवीन निविदाकाराची नेमणूक होईपर्यंत वा त्याने मालाचा पुरवठा सुरु करेपर्यंत पुरवठादारांस वरील कालावधीसाठी विहीत केलेल्या दरातच मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील व त्याकरीता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. तसेच कालावधीबाबतचा न्यासाचा निर्णय अंतिम राहील.

२) निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाकाराने पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅंकेची असणे आवश्यक आहे

३) किराणा मालाचे परिमाण हे हवाबंद पिशवी मध्ये असणे आवश्यक आहे. फाटलेल्या पिशवीतील माल स्वीकारला जाणार नाही.

४) ई निविदाधारक हा हिंदू असावा. तसेच महाराष्ट्रातील असावा. तसेच त्यांना धार्मिक स्थळे, नामांकित कंपन्या, उपहारगृहे, रूग्णालय, शासकीय विभाग/ कार्यालये अशा स्वरूपाच्या ठिकाणी किराणा माल पुरवठा करण्याच्या कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

५) न्यासाच्या खरेदी विभागाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी माल पुरवावा लागेल. आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत मालाची मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

६) निविदाकाराने मालाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. माल खरेदी विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास माल गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

७) निविदेमध्ये नमूद केलेल्या वार्षिक परिमाणापेक्षा जादा मालाची मागणी न्यासाकडून झाल्यास मालाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे बंधनकारक राहील.

८) न्यासाला पुरविण्याचा माल हा न्यासाने विनिर्देश (Specification) केल्यानुसार नमुनाबरहुकूम शुध्द, उत्तम प्रकारचा पुरवावा लागेल. दुय्यम वा कमी दर्जाचा माल किंवा खराब माल स्वीकारला जाणार नाही. अशा मालाचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील. अन्यथा, मालाची नासधूस झाल्यास त्यासाठी न्यास जबाबदार राहणार नाही. खराब मालाची देयके अदा केली जाणार

९) निविदा प्रक्रियेमध्ये स्वीकृत केलेले दर वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास आपली बयाना / बॅक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यासाचा निर्णय अंतिम राहील.

१०) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल ७ दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहीत मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचा माल खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल.

११) विहित कालावधीत मालाचा पुरवठा न केल्यास अन्य पुरवठादाराकडून अथवा बाजारभावाने माल मागविण्याची मुभा न्यासास राहील. अशा प्रकरणी अट क्र. १० नुसार कारवाई करण्यात येईल.

१२) पुरवठादाराने सदोष माल उपलब्ध केल्यास पुरवठादाराचा करार तात्काळ रदद् करून नव्याने ई–निविदा प्रक्रिया करण्याचा अधिकार न्यासास राहील. या विरोधात कुठल्याही लवादा समोर दाद मागता येणार नाही.

१३) देयकामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आवश्यक ती करकपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा पुरवठा करणेत आलेल्या मालाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१४) मालाचा पुरवठा आदेश व देयकाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास बृन्हमुंबई न्यायालयीन कार्यक्षेत्रात राहील.

१५) कार्यादेशाच्या दिनांकापासुन एका महिन्याच्या आत समक्ष येवून रू. ५०० च्या स्टॅम्पपेपरवर करारनामाचे प्रारूप न्यासास सादर करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग म्हणून ग्राह्य धरण्यात येतील. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही.

१६) बयाना रक्कम ही निविदा स्वीकृतीनंतर ६० दिवसांच्या आत परत करण्यात येईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कम (Bank Guarantee) ही पुरवठा करार संपल्यावर पुरवठादाराविरुद्ध कोणतीही तक्रार नसल्यास ९० दिवसानंतर परत करण्यात येईल. या दोनही रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१७) आपात्कालीन परिस्थितीत ई–निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१८) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

१९) माल पाठविताना रविवार व मंगळवार खेरीज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पाठविण्याची दक्षता घेणे आवश्यक असेल. रविवार व मंगळवार या दिवशी माल उतरवून घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. न्यासाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत माल उतरविण्यात यावा. परस्पर माल उतरवून दिल्यास सदर मालाच्या हिशोबाची व प्रदानाची जबाबदारी न्यासावर राहणार नाही.

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

२०) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल. निविदाधारकांच्या ऑनलाईन कागदपत्रांच्या पुर्ततेसंबधात तांत्रिक निविदेमध्ये अनावधानाने कागदपत्राची पुर्तता करावयाची राहिल्यास सदरील कागदपत्रे तांत्रिक निविदा उघडताना मा. खरेदी उप समितीच्या मान्यतेने पडताळणीकरून निविदाधारकाच्या पात्र / अपात्रतेबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

२१) कंत्राटदारास कोणत्याही संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुषंगाने त्यांना काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्या विरुद्ध न्यायलयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र नोटरी करून सादर करणे आवश्यक राहील.

२२) तांदुळ व गव्हाचे पीठ हा किराणा माल वगळून इतर माल प्रत्येकी १ किलोच्या पॅकिंगमध्ये भरावा. पुरवठादाराने पुरवठा करावयाचा किराणा माल /वस्तूंच्या पॅकिंगवर (ब्रॅन्डेड नसलेला) पुरवठादाराचे नाव/तपशील असणे आवश्यक आहे. पॅकिंगवर नाव तपशील नसलेल्या मालाचा /वस्तूंचा स्विकार करण्यात येणार नाही याची विशेष नोंद घ्यावी.

२३) निविदापुर्व बैठकीस निविदाकार अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहील याची काळजी घ्यावी. यासंदर्भात खालील नमूद क्रमांकावर संपर्क साधावा. निविदेच्या अनुषंगाने निविदाकारास कोणत्याही आवश्यक माहीती साठी खालील क्रमांकावर संपर्क करावा.

२४) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट / अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| श्रीमती. राखी चव्हाण, कार्यकारी अधिकारी | ९७०२५४८२०४ |
| डॉ. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी | ७९७७७५३७१६ |
| श्री. जर्नादन शिरवडकर, पर्यवेक्षक | ९८६७७२०१११ |

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 02262491111/160
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
purchase@siddhivinayak.org

दिनांक — / / २०२६

# मुल्य निविदा (वाणिज्यिक–Commercial) बीड ऑफ कोटेशन (BOQ)

निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव : ------------------------------------------------

निविदाधारकाचा कायमचा पत्ता : ------------------------------------------------

------------------------------------------------

निविदाधारकाचा सेवाकर नोंदणी क्रमांक (GST No.) :------------------------------------------------

मूळ निविदा (वाणिज्जीक– Commricial) BOQ

| अ. क्र. | किराणा माल (जिन्नस) | वर्षभरासाठी अंदाजे | प्रमाण | दर (प्रति किलो/नग) | वर्षभरात अंदाजे होणारी किराणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | डाळ चना | 70 | किलो | | |
| 2 | डाळ भाजकी | 130 | किलो | | |
| 3 | डाळ मूग | 800 | किलो | | |
| 4 | डाळ देशी तूर | 1500 | किलो | | |
| 5 | डाळ उडीद गोटा | 650 | किलो | | |
| 6 | डाळ राई | 5 | किलो | | |
| 7 | तांदूळ, ३०कि.पिशवी (बासमती सीसी डायमंड ११२१) | 2000 | किलो | | |
| 8 | तांदूळ जुना, ३०कि. पिशवी (जय श्रीराम वाडा कोलम) | 6000 | किलो | | |
| 9 | तांदूळ उकडा (इडलीकरीता) | 300 | किलो | | |
| 10 | चना काबुली | 320 | किलो | | |
| 11 | चना हरभरा | 150 | किलो | | |
| 12 | चवळी जाडी | 180 | किलो | | |
| 13 | राजमा | 120 | किलो | | |
| 14 | मसूर | 50 | किलो | | |
| 15 | मटकी | 80 | किलो | | |
| 16 | मूग | 50 | किलो | | |
| 17 | सोयावडी छोटी | 30 | किलो | | |
| 18 | वाल कडवे | 80 | किलो | | |
| 19 | वाटाणे काळे | 200 | किलो | | |
| 20 | वाटाणे हिरवे | 200 | किलो | | |
| 21 | वाटाणे सफेद | 180 | किलो | | |
| 22 | लोणचे – चिल्ली,मॅंगो,५कि.बरणी (ब्रॅन्ड प्रविण) | 70 | बरणी | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 23 | शेवया रोस्टेड (ब्रॅन्ड बॉम्बीनो) | 75 | किलो | | |
| 24 | राईस सेवाई (ब्रॅन्ड एम टी आर) | 200 | किलो | | |
| 25 | शेंगदाणे | 250 | किलो | | |
| 26 | शेंगदाणे रोस्टेड | 400 | किलो | | |
| 27 | चारोळी | 15 | किलो | | |
| 28 | पापड मिनी (ब्रॅन्ड लिज्जत) | 500 | किलो | | |
| 29 | पोहे जाडे (२कि.पॅकिग) | 1500 | किलो | | |
| 30 | पोहे पातळ | 50 | किलो | | |
| 31 | रवा (२कि.पॅकिग) | 1500 | किलो | | |
| 32 | रवा इडली | 80 | किलो | | |
| 33 | साबुदाणा | 1000 | किलो | | |
| 34 | टोमॅटो सॉस पाउच (ब्रॅन्ड किसान) | 60 | किलो | | |
| 35 | चिल्ली सॉस | 40 | किलो | | |
| 36 | सोया सॉस | 25 | किलो | | |
| 37 | नेसकॉफी क्लासीक, २००ग्रॅम बॉटल ( ब्रॅन्ड नेसले ) | 140 | बॉटल | | |
| 38 | कावा डिटॉक्स ग्रीनटी, ३६पॅकेट बॉक्स (ब्रॅन्ड | 40 | बॉक्स | | |
| 39 | मैदा | 250 | किलो | | |
| 40 | सफेद तीळ | 20 | किलो | | |
| 41 | लाप्सी | 25 | किलो | | |
| 42 | खजूर | 50 | किलो | | |
| 43 | शेव बारीक | 120 | किलो | | |
| 44 | फरसाण–बारीकशेव मिक्स तिखट (मिसळकरीता) | 550 | किलो | | |
| 45 | अरारोड | 80 | किलो | | |
| 46 | इनो १०० ग्रॅम बॉटल | 50 | बॉटल | | |
| 47 | कोकनट पावडर | 60 | किलो | | |
| 48 | फ्रायम मिक्स भेल | 150 | किलो | | |
| 49 | पीठ तांदुळाचे (भाकरीकरीता) | 80 | किलो | | |
| 50 | पीठ मोदकाचे (बासमती) | 500 | किलो | | |
| 51 | पीठ खमंग ढोकळा (ब्रॅन्ड तळोद) | 350 | किलो | | |
| 52 | गव्हाचे पीठ १०कि.पिशवी(ब्रॅन्ड एमपी सिओर,प्रिमिअर) | 6000 | किलो | | |
| 53 | पावडर चहा (ब्रॅन्ड सोसायटी प्रिमीयर) | 600 | किलो | | |
| 54 | मगज | 100 | किलो | | |
| 55 | चिंच | 100 | किलो | | |
| 56 | कोकम आगळ ५ लि.कॅन (ब्रॅन्ड ओमकार) | 5 | कॅन | | |
| 57 | कोकम आगळी | 8 | किलो | | |
| 58 | ओवा अजवाईन | 5 | किलो | | |
| 59 | मोहरी राई | 100 | किलो | | |
| 60 | मीठ (ब्रॅन्ड टाटा) | 1000 | किलो | | |
| 61 | काजू कनी | 120 | किलो | | |
| 62 | तेल फिल्टर फॉच्युन सनफलॉवर १५कि.डबा | 400 | डबे | | |
| 63 | डालडा (ब्रॅन्ड डालडा) यलो पॅकीग | 30 | किलो | | |
| 64 | सुखा खोबरे वाटी | 180 | किलो | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 65 | गुळ (चिकी) | 50 | किलो | | |
| 66 | काजू तुकडा | 80 | किलो | | |
| 67 | काजू फाडा | 15 | किलो | | |
| 68 | बदाम | 25 | किलो | | |
| 69 | पिस्ता | 25 | किलो | | |
| 70 | बटर (अमूल ५०० ग्रॅम) | 15 | किलो | | |
| 71 | मसाला चाट (एव्हरेस्ट) | 25 | किलो | | |
| 72 | मसाला गरम (एव्हरेस्ट) | 15 | किलो | | |
| 73 | मसाला गोडा (बेडेकर) | 40 | किलो | | |
| 74 | मसाला कि.किंग (एव्हरेस्ट) | 25 | किलो | | |
| 75 | मसाला मालवणी (एव्हरेस्ट) | 20 | किलो | | |
| 76 | मसाला छोले (एव्हरेस्ट) | 10 | किलो | | |
| 77 | मसाला शाही बिर्याणी (एव्हरेस्ट) | 5 | किलो | | |
| 78 | मसाला पावभाजी (एव्हरेस्ट) | 8 | किलो | | |
| 79 | मसाला लोणचे (एव्हरेस्ट) | 5 | किलो | | |
| 80 | पावडर धने (एव्हरेस्ट) | 40 | किलो | | |
| 81 | पावडर हळद (एव्हरेस्ट) | 80 | किलो | | |
| 82 | पावडर सांबर (एव्हरेस्ट) | 25 | किलो | | |
| 83 | पावडर काश्मीरी मिरची (एव्हरेस्ट) | 100 | किलो | | |
| 84 | पावडर तिखट मिरची (एव्हरेस्ट) | 50 | किलो | | |
| 85 | पावडर हिंग (एलजी) | 50 | किलो | | |
| 86 | मसाला इलायची | 4 | किलो | | |
| 87 | जीरा साही | 2 | किलो | | |
| 88 | बडीशेप | 10 | किलो | | |
| 89 | बोर मिर्ची | 5 | किलो | | |
| 90 | दालचिनी | 5 | किलो | | |
| 91 | धने | 30 | किलो | | |
| 92 | जायपत्री | 5 | किलो | | |
| 93 | जीरा | 100 | किलो | | |
| 94 | काळी मिरी | 5 | किलो | | |
| 95 | बेडगी दांडीकट मिर्ची | 60 | किलो | | |
| 96 | खसखस | 8 | किलो | | |
| 97 | लवंग | 5 | किलो | | |
| 98 | मेथी कसुरी | 8 | किलो | | |
| 99 | स्टार फूल | 4 | किलो | | |
| 100 | तमालपत्रा | 2 | किलो | | |
| 101 | नाचणी पीठ | 150 | किलो | | |
| 102 | ज्वारी पीठ | 150 | किलो | | |
| | वर्षभरात अंदाजे होणारी किराणा मालाची एकूण रक्कम | | | | |

निविदाधारकाची सही व शिक्का

उपरोक्त मूल्य निविदेचे प्रारूप केवळ माहितीकरीता सोबत देण्यात आले आहे. मात्र सदरील तक्त्यातील माहिती तांत्रिक निविदेसोबत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे मुल्य निविदेच्या विहित नमुन्यात भरण्यात यावी.